महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

**दिन विशेष...**
१६६५ : पुरंदर किल्ल्याला वेढा घालणाऱ्या दिलेरखानाशी झुंज देताना शूर मुरारबाजीचा मृत्यू.
१९२९ : इंग्लंड ते भारत अशी विमानमार्गे साप्ताहिक टपालसेवा सुरू करण्यात आली.
१९७६ : विख्यात चित्रकार, रंगसम्राट श्री रघुवीर मुळगावकर यांची पुण्यतिथी.

सेन्सेक्स ७३,५८३.२२ -१,६९०.२३ (२.२५%)
डॉलर ₹ ९४.८६

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३९ | २४ |
| दिल्ली | ३१ | २३ |
| मुंबई | ३४ | २५ |
| नागपूर | ३८ | २४ |
| पुणे | ३८ | १८ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार , दि. ३० मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १३८ किंमत : ५ रु. | पाने ४

**सुविचार**
स्वप्न पाहणे हा केवळ रात्रीच्या स्वप्नांपुरता मर्यादित नसतो; ते दिवसाच्या प्रत्येक क्षणात, आपल्या कामात, आणि आपल्या ध्येयांमध्ये देखील आहे.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:२३ संध्या-६:४२

**सोने – चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४९,८७५/- २,४५,०००/-

# अमेरिकेत ट्रम्पविरोधात ८० लाख लोक रस्त्यावर

## ३,३०० ठिकाणी निदर्शने, इराण युद्ध अन् महागाईवरून पदावरून हटवण्याची मागणी

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

**अमेरिकेत शनिवारी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या विरोधात झालेल्या 'नो किंग्स रॅली'मध्ये ८० लाख लोकांनी भाग घेतला. मीडिया रिपोर्ट्सनुसार, संपूर्ण अमेरिकेतील सर्व ५० राज्यांमध्ये ३,३०० पेक्षा जास्त ठिकाणी हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते.**

आयोजकांनी सांगितले की, ऑक्टोबरमध्ये झालेल्या मागील नो किंग्स आंदोलनाच्या तुलनेत यावेळी सुमारे १० लाख अधिक लोक सहभागी झाले आणि जवळपास ६०० हून अधिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

आंदोलन करणाऱ्या लोकांचे म्हणणे आहे की, ते ट्रम्प सरकारच्या अनेक धोरणांवर नाराज आहेत. त्यांचा राग विशेषतः इराणसोबत वाढलेला तणाव, कठोर इमिग्रेशन कारवाई आणि वाढत्या महागाईबद्दल आहे. अनेक ठिकाणी लोकांनी ट्रम्प आणि उपराष्ट्रपती जेडी वेंस यांच्या विरोधात पोस्टर्स दाखवले आणि त्यांना पदावरून हटवण्याची मागणी केली. न्यूयॉर्कच्या टाइम्स स्क्वेअर आणि मॅनहॅटन परिसरातही मोठ्या संख्येने लोक जमले होते. गर्दी इतकी जास्त होती की पोलिसांना अनेक रस्ते बंद करावे लागले. शिकागोमध्येही हजारो लोक रस्त्यावर उतरले

(पान २ वर)




**लोकांनी सर्जनशील पद्धतीने निषेध व्यक्त केला** – अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन डीसीमध्ये 'नो किंग्स' आंदोलनादरम्यान एका महिला आंदोलकाने लोकांना स्वतःवर नकली रक्त ओतले. फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये एक महिला स्टॅच्यू ऑफ लिबर्टीच्या वेशात आंदोलनात सहभागी झाली. अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन डीसीमध्ये 'नो किंग्स' आंदोलनादरम्यान लोकांनी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या पुतळ्याद्वारे आपला निषेध व्यक्त केला.

# अमेरिका-इराण युद्धाच्या काळात भारताने श्रीलंकेला पाठवले ३८ हजार मेट्रिक टन इंधन

वृत्तसंस्था । नवी दिल्ली



**अमेरिका–इस्रायल आणि इराण याच्यात पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक तेल आणि गॅस पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले आहेत. यादरम्यान भारताने एक महत्त्वाचा निर्णय घेत श्रीलंकेसाठी मदतीचा हात पुढे केला आहे. श्रीलंकेतील ऊर्जा संकटाच्या काळात भारताने श्रीलंकेत इंधन पाठवल्याबद्दल श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष अनुरा कुमार दिसानायके यांनी रविवारी भारताचे आभार मानले आहेत.**

श्रीलंकेच्या राष्ट्राध्यक्षांनी सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर यासंबंधी पोस्ट केली आहे, ज्यामध्ये त्यांनी भारताकडून श्रीलंकेला ३८ हजार मेट्रिक टन इंधन मिळाल्याचे म्हटले आहे.

'पश्चिम आशियातील संघर्षामुळे श्रीलंकेला सामना करावा लागत असलेल्या इंधन पुरवठ्यातील अडथळ्यांबाबत काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा केली होती. भारताने तात्काळ दिलेल्या पाठिंब्याबद्दल आभारी आहे. काल ३८००० मेट्रिक टन इंधन कोलंबोमध्ये दाखल झाले.

**थोडक्यात**



## अमेरिकेने इराणच्या खात्म्याचा बनवला 'मास्टर प्लॅन'

**तेहरान ।** इराणसोबत वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, अमेरिका आता जमिनीवरील लष्करी कारवाईची तयारी करत आहे. एका इंगजी वर्तमानपत्रातील एका वृत्तानुसार, 'पेंटागॉन इराणमध्ये एका संभाव्य जमिनीवरील कारवाईची योजना आखत आहे, जी अनेक आठवडे चालू शकते. असे म्हटले आहे. दरम्यान, हजारो अमेरिकी सैनिक आणि मरीन मध्य-पूर्वेत दाखल झाले आहेत. जर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध वाढवण्याचा निर्णय घेतला, तर हे पाऊल उचलले जाऊ शकते.

# कांदा दरात ५० टक्क्यांहून अधिक घसरण

वृत्तसंस्था । नाशिक

**राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या अभूतपूर्व आर्थिक संकटातून जात असून कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये दरात झालेल्या तीव्र घसरणीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या कांद्याला सरासरी केवळ ३०० ते ८०० रुपये प्रतिक्विंटल इतका कमी दर मिळत आहे. हा दर उत्पादन खर्चाच्या निम्म्याहूनही कमी आहे. कांदा दरातील घसरण थांबविण्यासाठी राज्य सरकारने तातडीने बाजार हस्तक्षेप योजना (एमआयएस) लागू करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने केली आहे.**

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना यासंदर्भात ई-मेलद्वारे सविस्तर निवेदन पाठविले आहे. कांद्याचा उत्पादन खर्च दीड हजार



ते १८०० रुपये प्रति क्विंटल आहे. सध्या त्याचे दर निम्म्याहून कमी झाले आहेत. बाजारात मिळणाऱ्या दरात काढणी व वाहतूक खर्चदेखील भरून काढणे अशक्य झाले आहे.

परिणामी, शेतकऱ्यांवर मातीमोल दराने विक्रीची वेळ आली असून अनेक ठिकाणी शेतकरी रस्त्यावर कांदा फेकण्याच्या मनस्थितीत पोहोचले असल्याकडे दिघोळे यांनी लक्ष वेधले. केंद्र सरकारची योजना उपलब्ध असताना आणि कांद्याचे दर उत्पादन

(पान २ वर)

# नाशिक पोलीस आयुक्तालय राज्यात प्रथम; १५० दिवसांचा ई-प्रशासन उपक्रम

प्रतिनिधी । नाशिक

**राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या १५० दिवसांच्या ई गव्हर्नन्स कार्यक्रमात पोलीस आयुक्तालय गटात 'नाशिक जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला' उपक्रम राबविणाऱ्या नाशिक पोलीस आयुक्त कार्यालयाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. यानिमित्त मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या कार्यक्रमात पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांचा गौरव करण्यात आला.**



यावेळी माहिती व तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी १५० दिवसांचा कृती आराखड्याबाबत शासकीय कार्यालयांमध्ये ई-प्रशासन सुधारणा आणण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार राज्य शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी १५० दिवसांचा ई-प्रशासन सुधारणा कार्यक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात कार्यालयाचे संकेतस्थळ, आपले सरकार प्रणाली, ई-कार्यालय, कार्यालयाचा 'डॅश बोर्ड', 'व्हॉटस ॲप', 'चॅटबॉट', कृत्रिम बुद्धिमत्ता व 'ब्लॉक चेन'चा वापर आणि भौगोलिक माहिती प्रणाली या सात घटकांवर सहभागी कार्यालयांचे मूल्यमापन करण्यात आले होते.

१५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांनी केलेल्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषदेतर्फे करण्यात आले होते. त्यात 'नाशिक जिल्हा- कायद्याचा बालेकिल्ला' उपक्रम राबविणाऱ्या नाशिक पोलिस आयुक्त कार्यालयाने सर्वाधिक १५६.२५ गुण मिळवून पोलिस आयुक्तालय गटात राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या नेतृत्वाखाली नाशिक पोलीस आयुक्तालयाने डिजिटल उपक्रम राबविले. नागरिकांशी थेट संवादाचे उपक्रम राबविले. यामध्ये 'ई-मीट वीथ सीपी', 'वॉक इन टूर', नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य आदींचा समावेश आहे. यामुळे पोलिस दलाच्या कामकाजात पारदर्शकता, गतिमानता येऊन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर झाला. या विषयी पोलीस आयुक्त संदीपकर्णिक यांनी राज्य शासनाने दिलेल्या १५० दिवसांच्या कार्यक्रमात नाशिक पोलिस दलाने प्रभावी कामगिरी बजावली. त्यामुळे राज्यात प्रथम क्रमांक मिळाला. नागरिकांच्या सुरक्षेसाठी नाशिक पोलिस आयुक्तालय सदैव तत्पर असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

# 'गैरसमज पसरवू नका' ; मध्य-पूर्वेतील संकटाबाबत पंतप्रधान मोदींनी दिला इशारा

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज ऑल इंडिया रेडिओवर प्रसारित झालेल्या मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून भारत आणि परदेशातील लोकांशी आपले विचार व्यक्त केले.**

'मन की बात'च्या १३२ व्या भागात त्यांनी इशारा दिला की, सुरू असलेल्या संघर्षांचा प्रमुख ऊर्जा क्षेत्रांवर सातत्याने परिणाम होत आहे आणि त्यामुळे जागतिक पेट्रोल आणि डिझेलचे संकट अधिकच गडद होत आहे. पुढे पंतप्रधान मोदी म्हणाले, 'हा मार्च महिना जागतिक स्तरावर अत्यंत घटनापूर्ण ठरला आहे. आपल्या सर्वांना



आठवत असेल की, भूतकाळात कोविडमुळे संपूर्ण जगाला दीर्घकाळ अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले होते. कोविडच्या संकटातून सावरल्यानंतर जग एका नव्या सुरुवातीसह प्रगतीचा मार्ग प्रशस्त करेल, अशी आशा आपल्या सर्वांना होती, परंतु जगाच्या विविध भागांमध्ये युद्ध आणि संघर्षाची परिस्थिती निर्माण होत राहिली'.

**'आपल्या शेजारी महिनाभर भीषण युद्ध'**

'मन की बात'मध्ये पंतप्रधान मोदी म्हणाले की, आपल्या शेजारी महिनाभर भीषण युद्ध सुरू आहे. आपल्या लाखो कुटुंबांचे नातेवाईक या देशांमध्ये राहतात, विशेषतः आखाती देशांमध्ये काम करणारे. मी आखाती देशांचा मनापासून आभारी आहे; ते तेथील १० दशलक्षाहून अधिक भारतीयांना सर्व प्रकारची मदत पुरवत आहेत.

**अफवांना बळी पडू नका : मोदी**

ते पुढे म्हणाले की, हा निश्चितच एक आव्हानात्मक काळ आहे. आज, मन की बात च्या माध्यमातून मी सर्व देशवासियांना पुन्हा एकदा आवाहन करतो की, आपण एकजूट होऊन या आव्हानावर मात केली पाहिजे. मी सर्व देशवासियांना सतर्क राहण्याचे आणि अफवांना

(पान २ वर)

## औषधांच्या किमतीही कडाडणार!

वृत्तसंस्था । नवी दिल्ली



युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यामुळे कच्च्या मालाच्या (पॉलिमर) किमतीत मोठी वाढ झाली आहे. भारतातील अनेक कंपन्यांनी प्लास्टिकच्या कच्च्या मालाच्या दरात मोठी वाढ केल्याने सर्वसामान्यांचे बजेट कोलमडणार आहे.

एका वृत्तवाहिनीने दिलेल्या माहितीनुसार, होमोपॉलिमर पॉलीप्रोपाईलीनच्या किमतीत प्रति टन ४,००० रुपयांची, तर कोपॉलिमर आणि पॉलीइथिलीनच्या दरात प्रति टन ७,००० रुपयांची वाढ झाली आहे.

# रुपाली चाकणकरांना एसआयटीचे समन्स..?

## थेट अटक करा : रोहिणी खडसेंची मागणी

प्रतिनिधी । जळगाव



नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरातची पाद्यपूजा केल्यानंतर वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांना पदावरुन पायउतार व्हावे लागले आहे. त्यानंतर आता त्यांना खरात प्रकरणाची चौकशी करणाऱ्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) समन्स बजावल्याचे सांगितले जात आहे. यावरुन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी एसआयटीने थेट अटक करावी, राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

या प्रकरणाचे पडसाद केवळ कायद्यापुरते मर्यादित न राहता आता थेट राजकीय पातळीवर उमटू लागले असून, विविध राजकीय पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली आहे. या प्रकरणामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षातही मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे.

(पान २ वर)

**या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनीही अप्रत्यक्ष टीका करत राजकीय वातावरण तापवले आहे. त्यांनी समाज माध्यमावर केलेल्या सूचक पोस्टमध्ये, वैयक्तिक कारणांपासून सुरु झालेला माज दोन ओळींच्या राजीनाम्यावर उतरला, असा उल्लेख करत रुपाली चाकणकरांवर निशाणा साधल्याचे दिसून आले. तेवढ्यावरच न थांबता रोहिणी खडसे यांनी आता चाकणकरांना पुन्हा एकदा निशाणा साधल्याचे दिसून येत आहे. चाकणकरांना खरातप्रकरणी एसआयटीने समन्स बजावल्याचा दावा करतानाच, नुसते समन्स न बजावता थेट अटकेची कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. त्यामुळे चाकणकरांवरुन दोन्ही राष्ट्रवादीतील वाद आणखी विकोपाला जाण्याची चिन्हे दिसून येत आहेत.**

# दादर-भुसावळ एक्स्प्रेस व्हाया नंदुरबार, अमळनेर कायमस्वरूपी धावणार!

## • एक्स्प्रेस नियमित सेवेत समाविष्ट करण्यात येणार : खासदार स्मिता वाघ

प्रतिनिधी । जळगाव

**दादर–भुसावळ (०९०५१/५२) या त्रिसाप्ताहिक विशेष गाडीची वेळोवेळी मुदत वाढवून खान्देशातील जळगावसह धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्यातील प्रवाशांची सोय करण्याचा प्रयत्न पश्चिम रेल्वेने आतापर्यंत केला. मात्र, ही गाडी यापुढील काळात कायमस्वरूपी चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, ही गाडी नव्या क्रमांकासह (१९०४७/४८) नियमित सेवेत समाविष्ट करण्यात येणार असल्याची माहिती खासदार स्मिता वाघ यांनी दिली आहे.**




विशेष गाडी नियमित झाल्यानंतर दादर-भुसावळ एक्स्प्रेसच्या तिकिट दरात तब्बल २० ते २५ टक्क्यांपर्यंत कपात होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. यामुळे नियमित प्रवास करणाऱ्या नोकरदार, विद्यार्थी, व्यापारी तसेच रुग्णांना मोठा आर्थिक दिलासा मिळू शकणार आहे. किफायतशीर आणि सुरक्षित प्रवासाचा पर्याय अधिक बळकट होणार आहे. ही गाडी आठवड्यातून तीन दिवस सोमवार, बुधवार आणि शनिवार धावणार असल्याने मुंबई (दादर) ते भुसावळ दरम्यान खान्देशातील विविध स्थानकांना जोडणारी महत्त्वाची वाहतूक साखळी अधिक सक्षम होणार आहे.

विशेषतः मुंबईत नोकरी, शिक्षण किंवा व्यवसायासाठी जाणाऱ्या खान्देशातील नागरिकांसाठी ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. प्राप्त माहितीनुसार, या गाडीला प्रवाशांचा सातत्याने चांगला प्रतिसाद मिळत असल्यामुळेच तिला कायमस्वरूपी चालविण्याचा निर्णय घेण्यात

(पान २ वर)

### तूर्त विशेष गाडी म्हणून मुदतवाढ

दरम्यान, पश्चिम रेल्वे प्रशासनाकडून तूर्त दादरभुसावळ (०९०४९) आणि भुसावळ–दादर (०९०५०) दरम्यान आठवड्यातून एक दिवस दर शुक्रवारी धावणाऱ्या साप्ताहिक विशेष गाडीचा कालावधी तीन एप्रिलपासून ३१ जुलै २०२६ पर्यंत वाढविण्यात आला आहे. याशिवाय, दादर–भुसावळ (०९०५१) आणि भुसावळदादर (०९०५२) दरम्यान आठवड्यातून तीन दिवस सोमवार, बुधवार आणि शनिवारी धावणाऱ्या त्रिसाप्ताहिक विशेष रेल्वे गाड्यांचा कालावधी ३० मार्चपासून २९ जुलै २०२६ पर्यंत वाढविण्यात आला आहे.

## संपादकीय

### अनिश्चितता संपुष्टात

हिंदू, बौद्ध आणि शीख या धर्मातील कोणत्याही अनुसूचित जातीतील व्यक्तीने म्हणजे एससीने धर्मांतर केले तर एससी म्हणून मिळणारे लाभ, संरक्षण व हक्क तो गमावतो. सर्वोच्च न्यायालयाने हा ऐतिहासिक निर्णय दिला. त्यामुळे बऱ्याच काळापासून सुरू असलेला गोंधळ व याबाबतची अनिश्चितता संपुष्टात येण्यास आता हरकत नाही. अगोदर आंध्र प्रदेश न्यायालयाने याबाबतचा निर्णय दिला होता. एका व्यक्तीने धर्मांतर केले होते. तरीही त्याच्या मूळ धर्मानुसार त्याला एससी म्हणून मिळणाऱ्या सुविधा हव्या होत्या. त्याची ही मागणी आंध्र न्यायालयाने नाकारली होती. त्या निर्णयावर आता सुप्रीम कोर्टानेही मोहोर उमटवल्यामुळे भविष्यात या विषयी कोणती संदिग्धता राहणार नाही. वास्तविक असे विषय हे सरकारच्या स्तरावरच घेतले जाणे अपेक्षित असते. त्यात कोणता संभ्रम असेल तर तो दूर करणे आवश्यक असते. त्या विषयाची साधक बाधक चर्चा करायची असते. जेव्हा अशा चर्चांत लोकप्रतिनिधी सहभागी होतात तेव्हा विषय आपोआपच जनमानसापर्यंत पोहोचतो व त्यांच्या हरकती आणि सूचनाही समोर येत असतात. राजकीय पक्षांकडून तसे काही होऊ दिले जात नसल्यामुळे लोकांमध्ये गोंधळ राहतो व अखेर प्रकरणे न्यायालयांकडून निकाली काढली जातात. भारतात धर्मांतराचा मुद्दा केवळ जातीशी निगडीत प्रश्नांशी संबंधित राहिलेला नाही. तो केवळ न्यायालयांपुरताही मर्यादित नाही तर राजकीय नफा आणि तोट्याच्या चष्म्यातूनही त्याकडे पाहिले जाते. कर्नाटकमधील अलीकडचे उदाहरण यावर अधिक प्रकाश टाकते. या राज्यातील मागासवर्ग आयोगाने काही काळापूर्वी जातगणना केली. त्यात एका विशिष्ट समुदायातील तेहतीस जाती सूचिबद्ध करण्यात आल्या. हिंदू धर्मात जाती आहेत. त्या सूचिबद्ध केल्या तर समजण्यासारखे आहे. मात्र काही समुदाय असेही आहेत की ते आपल्यात जाती नसल्याचे मानतात आणि तसे म्हणतातही. तथापि, राज्य सरकारच्या आयोगाने याच समुदायातील एवढ्या मोठ्या संख्येने जाती मागासवर्गात समाविष्ट केल्यामुळे गोंधळ उडाला. त्याचे कारण आरक्षणातील वाटेकरू वाढले व खरे लाभार्थी त्यापासून वंचित होण्याचा धोकाही निर्माण झाला.विरोधापुढे अखेर कर्नाटक सरकारला नमते घ्यावे लागले व त्यांनी आपला हा जातींना सूचिबद्ध करण्याचा निर्णय मागे घेतला. एवढे होऊनही चार जातींचा त्यांनी समावेश केला आहेच. धर्मांतराच्या मुद्द्यावर फार तपशीलात जायला नको; मात्र एखाद्या विशिष्ट परिस्थितीत हे प्रकार घडत असतात. काही वेळा आपण वंचित असल्याची भावना असते, काही वेळा आपल्या धर्माबाबत भ्रमनिरास झालेला असतो तर अनेक प्रकरणात फसवणुकीने, आमिष दाखवून अथवा बळजबरीनेही धर्मांतरे केली जातात. पैशासाठीही ते होतात अशा बातम्या आणि ओरडही आहेच. ज्या धर्मांचा दावा आहे की त्यांच्यात जातीभेद नाही अशा धर्मांतही अलीकडच्या काळात धर्मांतरित झालेली मंडळी स्वत:ला नव्या धर्मातील वेगळे आणि दुर्बल घटक मानू लागले आहेत. त्यावरूनच त्यांच्या पूर्वीच्या धर्मात त्यांना दुर्बल घटक म्हणून जे लाभ त्यांना मिळत होते तेच आपल्याला येथेही मिळतील अशी त्यांची अपेक्षा आहे. वास्तविक हा जागरूकतेच्या अभावामुळे निर्माण झालेला त्यांचा गोंधळच आहे. पण या गोंधळातून त्यांनी बाहेर पडावे यासाठी कोणी मदत करत नाहीत. उलट तो वाढता ठेवत अधिक संभ्रम निर्माण करून, त्यांना आमिषे दाखवून आपला राजकीय स्वार्थ कसा साधला जाईल याची दक्षता घेतली जाते. आंध्र प्रदेशातील जे प्रकरण चर्चेत आले आहे त्यात संबंधित व्यक्ती दुसऱ्या धर्माचे अनेक वर्षांपासून आचरणही करत होता. त्या धर्माच्या मान्यतेनुसार तो प्रार्थनांचे आयोजनही करत होता. असे असतानाही त्याला त्याच्या मूळ धर्मातील एससी वर्गाला जे मिळतात त्याच लाभांची अपेक्षा होती.

# मनपाच्या थकित पाणीपट्टी वसुलीसाठी विशेष मोहीम

**मनपा प्रशासनाने आता कंबर कसली; नितीन कापडणीस, उपायुक्त मालगावे यांची संयुक्त मोहीम**





**प्रतिनिधी । धुळे**

शहरातील मालमत्ताधारकांकडील थकीत पाणीपट्टी वसुलीकामी विशेष मोहिम, मनपा आयुक्त नितीन कापडणीस व उपायुक्त स्वालिया मालगावे नितीन कापडणीस व उपायुक्त स्वालिया मालगावे नितीन कापडणीस व उपायुक्त स्वालिया मालगावे यांच्या मार्गदर्शनाखाली हाती घेण्यात आली आहे. महानगरपालिका क्षेत्रातील थकीत पाणीपट्टी वसूल करण्यासाठी मनपा प्रशासनाने आता कंबर कसली आहे. शहरात विशेष वसुली मोहिम होती घेण्यात आलेली आहे. वारंवार सूचना देवूनही थकबाकी न भरणाऱ्या मालमत्ताधारकांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत प्रशासनाने दिले आहे.

धुळे शहरातील मालमत्ताधारकांपैकी काही मालमत्ताधारक मालमत्ता कर महानगरपालिकेकडे जमा करीत असतात. परंतु पाणीपट्टी महानगरपालिकेकडे जमा करीत नाही. याकारणास्तव शहरातील सर्वच भागातील मालमत्ता धारकांकडे मोठ्याप्रमाणावर पाणीपट्टी थकित आहे. सदरची पाणीपट्टी वसुलीकामी मनपा आयुक्त नितीन कापडणीस व उपायुक्त स्वालिया मालगावे यांच्या मार्गदर्शनाखाली ४ विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यात पाणीपटटी कर अधिक्षक, कनिष्ट अभियंता, लिपीक, फिटर या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. आज रोजी सुभाषनगर, जुनेधुळे या भागात सदरची विशेष मोहिम राविण्यात आली. त्यात ३ नळ कनेक्शन कट करण्यात आले. यापुढेही ही विशेष पाणीपटटी वसुलीबाबतची मोहिम संपुर्ण धुळे शहरात राबविण्यात येणार आहे. तरी नागरीकांनी थकीत पाणीपट्टी भरुन सदरची कटु कारवाई टाळावी व महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन धुळे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

# जलसंवर्धन योजना ग्रामस्थांनी एकजुटीने सांभाळावी : ना. रावल



**प्रतिनिधी । धुळे**

पाणी म्हणजे जीवन आहे. भारतीय संस्कृतीत पाण्याला महत्त्वाचे स्थान असून त्याचा संवर्धन व जतन करणे ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. म्हणजे जल जीवन मिशन अंतर्गत दि. ८ ते २२ मार्च दरम्यान जलमहोत्सव जिल्ह्यात नुकताच साजरा झाला. या महोत्सवाचा एक भाग म्हणून पूर्ण झालेल्या योजना ग्रामस्थांच्या स्वाधीन करण्याची प्रक्रिया जल अर्पण सोहळा होय. या सोहळ्याच्या आयोजन निमगुळ येथे करण्यात आले होते. त्यावेळी ना. रावल बोलत होते. ते पुढे म्हणाले, जलजीवन मिशन अंतर्गत निमगुळ गावात पूर्ण झालेली योजना आज ग्रामस्थांच्या स्वाधीन केली जात आहे. ही प्रक्रिया जल उत्सवच्या माध्यमातून पार पडत असून ग्रामस्थांच्या जबाबदारीत वाढ झाली असल्याचे ते म्हणाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजीज शेख म्हणाले, जलजीवन मिशन योजना राबवण्याच्या प्रक्रियेत धुळे जिल्हा राज्यात सातव्या क्रमांकावर आहे. लवकरच जिल्हा अग्रस्थानी राहील. यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी व्यासपीठावर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष महावीरसिंग रावल, माजी सभापती जिजाबराव पाटील, दीपक बोरसे, पाणी व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती निशा जाधव, कार्यकारी अभियंता जयश्री सार्वे, गटविकास अधिकारी रमेश नेतनराव उपस्थित होते.

# इस्कॉनच्या नवीन सत्संग भवनाचे उद्घाटन इस्कॉनचा प्रचार–प्रसार करण्याची शक्य तेवढी मदत करणार : आ. रघुवंशी

**प्रतिनिधी । नंदुरबार**

**आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघ अर्थात इस्कॉन परिवाराच्या करजकुमे शिवारात नवीन सत्संग भवनाचे उद्घाटन आ. चंद्रकांत रघुवंशी यांच्या हस्ते रामनवमीच्या मुहूर्तावर झाले.**




याप्रसंगी बोलताना आ.चंद्रकांत रघुवंशी म्हणाले की, हिंदू संस्कृतीला साता समुद्रापार पोहोचविण्याचे महान कार्य इस्कॉन परिवार करीत आहे. राजकीय व सामाजिक क्षेत्रातील प्रत्येक व्यक्तीने संघटितपणे काम करून इस्कॉनप्रमाणे धर्मकार्याच्या प्रचार प्रसार करावा.

इस्कॉनचा प्रचार प्रसार कार्यासाठी भविष्यात शक्य तेवढी मदत करण्याचे आश्वासन आ.चंद्रकांत रघुवंशी यांनी दिले.

सत्संग भवन उद्घाटनप्रसंगी आ. चंद्रकांत रघुवंशी यांच्या सोबत उद्योजक मोतीलाल ओस्तवाल, अनिल पाटील, गजेंद्र शिंपी, डॉ. राहुल पाटील शहादा, ॲड. जतीन वाघेला दोंडाईचा, आर्किटेक्ट सचिन साळी, मुकेश बॅटरीवाला, करण बालानी, निखिल देसाई, भालचंद्र पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन इस्कॉन परिवाराचे प्रमुख माधव शामसुंदर दास, मोतीलाल घमंडे आणि साधकांनी केले.

# विलासराव जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त टेनिस बॉल स्पर्धा

**प्रतिनिधी । पिंपळनेर**



कै. अण्णासाहेब शंकरराव भगाजी माळी फाउंडेशन चिकसेचे अध्यक्ष विलासराव जगताप यांच्या हस्ते टेनिस बॉल स्पर्धेची सुरुवात करण्यात आली. उद्योजक व गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर विलासराव जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपळनेर येथे भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एपीआय किरण बर्गे हे होते तर प्रमुख पाहणे म्हणून नगरसेवक ॲड.ज्ञानेश्वर एखंडे, पिंपळनेर तालुका पत्रकार संघटनेचे अध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार सुभाष जगताप, नगरसेवक प्रशांत चौधरी, चिकसे येथील सरपंच सुरेश खैरनार, माजी उपसरपंच जिभाऊ जगताप, मुक्तार शेख, वैभव नागरे, पी. एस. पाटील, अजय सूर्यवंशी, वेडू भगा जगताप, दिलीप सूर्यवंशी, प्रमोद भावसार, कैलास सूर्यवंशी, रवींद्र सूर्यवंशी, आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेचे उद्घाटन विलास जगताप व एपीआय किरण बर्गे यांनी श्रीफळ वाढवून केले. त्यानंतर दोघांनी बॅटिंग करत मॅचेस सुरू केल्या. पहिला सामना होण्याचा पाडा विरुद्ध धोंगडे येथील क्रिकेट क्लब यांच्यात रंगला.

## पान १ वरुन

**कांदा दरात ५० टक्क्यांहून......**

खर्चाच्या निम्म्यापेक्षा खाली गेले असताना राज्य सरकारने अजूनही हस्तक्षेप का केला नाही, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. एमआयएस योजना तातडीने लागू न झाल्यास राज्यात आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. एमआयएसच्या अटी पूर्ण – सद्यस्थितीत कांदा दरात ५० टक्क्यांपेक्षा जास्त घसरण झाली असून, ही परिस्थिती स्पष्टपणे त्रासदायक विक्रीची आहे. त्यामुळे बाजार हस्तक्षेप योजना अर्थात ङ्गएमआयएसफ लागू करण्यासाठी आवश्यक अटी पूर्ण झालेल्या आहेत. ही योजना लागू झाल्यास शासन बाजारात खरेदीदार म्हणून उतरल्यामुळे बाजारातील घबराट विक्री थांबेल. कांद्याच्या दरात स्थैर्य येईल आणि व्यापाऱ्यांकडून होणारी दरकपात नियंत्रित होईल. त्यामुळे शेतकऱ्यांना किमान उत्पादन खर्च परत मिळण्यास मदत होईल, असे महाराष्ट्र कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे म्हणणे आहे.

**'गैरसमज पसरवू नका'......**

बळी न पडण्याचे आवाहन करतो. ते पुढे म्हणाले की, जगभरात पेट्रोल आणि डिझेलबाबत संकट निर्माण होत आहे. आपले जागतिक संबंध, विविध देशांकडून मिळणारा पाठिंबा आणि गेल्या दशकात आपण विकसित केलेली ताकद, यांमुळे भारताला या परिस्थितीचा धैर्याने सामना करण्यास मदत झाली आहे.

**रुपाली चाकणकरांना......**

पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. याआधीच त्यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचाही राजीनामा दिला होता. मात्र, या दुहेरी राजीनाम्यानंतरही वाद शांत होण्याऐवजी अधिकच चिघळल्याचे चित्र आहे. दरम्यान, अशोक खरातशी संबंधित वाद अधिक गडद झाला तो त्याच्या पाद्यपूजेचे छायाचित्र समोर आल्यानंतर. या छायाचित्रांमध्ये रुपाली चाकणकरांचा सहभाग दिसून येत असल्याचा दावा करत विरोधकांनी नैतिकतेचा मुद्दा पुढे करत त्यांच्यावर जोरदार टीका सुरू केली. महिलांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या व्यक्तीने अशा वादग्रस्त व्यक्तीशी संबंध ठेवणे गंभीर असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे.

**दादर–भुसावळ एक्स्प्रेस......**

आला आहे. प्रवासी संख्या, मागणी आणि सोयी सुविधांचा विचार करून हा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच भविष्यात या गाडीच्या फेऱ्या वाढविण्याचा विचारही रेल्वे प्रशासन करत आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे सर्व स्तरांतून आभार व्यक्त करण्यात येत आहेत. जळगावच्या खासदार स्मिता वाघ यांनीही या निर्णयाचे स्वागत करत खान्देशातील नागरिकांच्या दीर्घकाळापासून असलेल्या मागणीला न्याय मिळाल्याने समाधान व्यक्त केले आहे. या सुविधेमुळे प्रवास अधिक सुलभ, किफायतशीर आणि सुरक्षित होईल. तसेच खान्देशाच्या सर्वांगीण विकासाला नवी गती मिळेल, असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, प्रवाशांकडूनही या निर्णयाचे स्वागत होत असून, नियमित आणि किफायतशीर रेल्वे सेवेमुळे त्यांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. रेल्वे प्रशासनाने भविष्यात आणखी सुविधा आणि नवीन रेल्वे गाड्या सुरु करुन खान्देशातील रेल्वेचे जाळे अधिक सक्षम करावे, अशी मागणीही प्रवाशांकडून होत आहे.

**अमेरिकेत ट्रम्पविरोधात......**

आणि 'ट्रम्प हटाओ'च्या घोषणा दिल्या. तेथील महापौरांनीही लोकांना संबोधित करताना सांगितले की, हे आंदोलन सातत्याने मजबूत होत आहे.राजधानी वॉशिंग्टन डीसीमध्ये लोक लिंकन मेमोरियल आणि नॅशनल मॉलच्या आसपास जमले आणि सरकारविरोधात घोषणाबाजी केली. अमेरिकेतील ओरेगन राज्यातील पोर्टलैंड येथे निदर्शनांनंतर वातावरण तणावपूर्ण झाले. निदर्शकांनी अमेरिकन इमिग्रेशन एजन्सीच्या कार्यालयाबाहेर अमेरिकेचा झेंडा जाळला. अमेरिकेत बहुतेक ठिकाणी निदर्शने शांततापूर्ण होती, परंतु लॉस एंजेलिसमध्ये काही ठिकाणी परिस्थिती बिघडली. तेथे काही निदर्शक आणि पोलिसांमध्ये संघर्ष झाला, ज्यात अनेकांना अटक करण्यात आली. इटलीची राजधानी रोममध्ये 'नो किंग्स' निषेध प्रदर्शनादरम्यान लोकांनी अनेक मोठ्या नेत्यांचे पोस्टर घेऊन प्रदर्शन केले. प्रदर्शनकर्त्यांच्या हातात इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू, इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात निदर्शने करण्यात आली.

# जिल्ह्यात ४३ ठिकाणी उष्माघात कक्ष सुरू जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बोडकेंची माहिती

**प्रतिनिधी । धुळे**

शहरासह जिल्हाभरात मार्चपासून तापमानात वाढ होत असून एप्रिलमध्ये उष्णतेची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी उष्माघात टाळण्यासाठी आवश्यक काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके यांनी केले आहे. उष्माघाताच्या रुग्णांना तत्काळ उपचार मिळावेत, यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत जिल्ह्यातील सर्व ४३ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उष्माघात कक्ष सुरू करण्यात आले आहेत. या कक्षांमध्ये आवश्यक औषधे, थंड पाणी व प्रथमोपचाराचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक उष्माघाताची लक्षणे चक्कर येणे किंवा बेशुद्ध पडणे, स्नायूंना गोळे येणे, डोकेदुखी, मळमळ, उलटी, जास्त घाम, अशक्तपणा व थकवा जाणवणे. गोंधळ, गुंगी, श्वासोच्छवास व हृदयाचे ठोके वाढणे, शरीराचे तापमान १०५ओ फॅरेनहाइटपर्यंत वाढणे, सूचना देण्यात आल्या आहेत. उन्हाळ्यात विशेषत: लहान मुले, गर्भवती, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी व बाहेरील काम करणारे मजूर यांना उष्माघाताचा धोका अधिक असल्याने त्यांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. उष्माघाताची लक्षणे दिसल्यास त्वरित जवळच्या आरोग्य केंद्रात जाऊन उपचार घ्यावेत.

# धुळे जिल्ह्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध

## नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवण्याचे जिल्हाधिकारी विसपुतेंचे आवाहन

**प्रतिनिधी । धुळे**

**आखातातील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर धुळे जिल्ह्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले आहे.**

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी सांगितले की, जिल्ह्यात १४० पेट्रोल पंप आहेत. तेथे इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. इंधन पुरवठा करणाऱ्या कंपन्यांकडून जिल्ह्यास इंधनाचा नियमितपणे पुरवठा सुरू आहे. जिल्हा प्रशासन इंधन पुरवठ्यावर लक्ष ठेवून आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच गरजेपेक्षा जास्त इंधनाची खरेदी करून अनावश्यक साठा करू नये. आखातातील युद्धजन्य परिस्थितीचा गैरफायदा किंवा अनधिकृत साठा किंवा चढ्या दराने विक्री करणे हा जीवनावश्यक वस्तू कायद्यानुसार गंभीर गुन्हा आहे. या परिस्थितीवरही पुरवठा विभाग लक्ष ठेवून आहे. याबरोबरच बरोबरच नागरिकांना सुरक्षेच्या कारणास्तव कोणत्याही गॅस सिलिंडरकरीता नियंत्रण कक्ष घरगुती वापराच्या गॅस सिलिंडर पुरवठा वितरणाबाबत तक्रारींचे निवारण करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. तेथे पुखठा निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. नागरिकांच्या गॅस सिलिंडर वितरणाबाबत काही तक्रारी असतील, तर नियंत्रण कक्षात संपर्क साधावा, असेही आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले आहे. परिस्थितीत प्लास्टिकच्या बाटल्या, कॅन, ड्रम आदींमध्ये इंधनाची विक्री करण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. अशा प्रकारे इंधनाची साठवणूक ही सुरक्षिततेच्या नियमांचे उल्लंघन असून ते अत्यंत धोकेदायक आहे. त्यामुळे नागरिकांनी इंधनाचा साठा करू नये, असेही आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले आहे.

# महसूल प्रशासनाने जनगणनेचे काम गांभीर्यपूर्वक पार पाडावे : जिल्हाधिकारी विसपुते

**प्रतिनिधी । धुळे**

### धुळ्यात जनगणना प्रशिक्षणाचा समारोप



जनगणना हे राष्ट्रीय कार्य आहे. शासनाच्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जनगणनेची माहिती अत्यंत महत्वाची आहे. त्यामुळे प्रत्येकाने जनगणनेचे कार्य गांभीर्यपूर्वक पूर्ण करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिल्या. जनगणना संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई आणि जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी, यांच्या संयुक्त विद्यमाने जनगणना २०२७ अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात तीन दिवसांपासून जिल्हास्तरीय प्रशिक्षण सुरू होते. त्याचा आज दुपारी समारोप झाला. त्यावेळी जिल्हाधिकारी विसपुते या बोलत होत्या. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी शरद पवार, जनगणना संचालनालयाचे उपसंचालक सागर बागूल, प्रशिक्षक पार्थ पहाड, श्रीकांत बनकर आदी उपस्थित होते. या प्रशिक्षणात चार्ज ऑफिसर आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते म्हणाल्या की, जनगणना २०२७ ही दोन टप्प्यांत होणार आहे. १ ते १५ मे या कालावधीत पहिल्या टप्प्यात प्रथमच स्वगणना सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. त्यात घरांची यादी व घरांची गणना केली जाईल. ही माहिती पुढील गणनेसाठी अत्यंत महत्वाची असणार आहे. त्यानंतर १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत घरोघरी जाऊन माहितीचे संकलन करण्यात येईल. जनगणना प्रक्रियेत सेन्सस २०२७–एचएलओ या मोबाईल ॲपच्या माध्यमातून डिजिटल पद्धतीने माहिती संकलन केले जाईल. त्यामुळे जनगणनेची माहिती अचूकपणे नोंदवावी. प्रत्येकाने याविषयीची माहिती समजून घ्यावी. काही अडचणी आल्या, तर जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यान्वित जनगणना कक्षाशी संपर्क साधावा. निवडणुकीत ज्या प्रमाणे जिल्हा प्रशासनातर्फे कार्यवाही केली जाते. त्या प्रमाणेच राष्ट्रीय जनगणनेचे काम पूर्ण करावे, असेही आवाहन त्यांनी केले. निवासी उपजिल्हाधिकारी पवार यांनी सांगितले की, मास्टर ट्रेनरचे प्रशिक्षण यशदात पूर्ण झाले आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# महापालिकेने गोलाणी मार्केटमध्ये राबविले स्वच्छता अभियान

## २२ टन कचरा संकलित; प्लास्टिक वापरणाऱ्या विक्रेत्यांवर थेट कारवाईचा बडगा







प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या मार्केट साफसफाई अभियानामध्ये रविवारी, २९ मार्च रोजी जळगाव शहरातील गजबजलेल्या गोलाणी मार्केट परिसरात महापौर दीपमाला काळे यांच्या उपस्थितीत भव्य स्वच्छता अभियान राबविण्यात आले. महापौरांनी स्वतः रस्त्यावर उतरून पाहणी केली. या मोहिमेने मोठ्या प्रमाणावर जनजागृती निर्माण झाली.**

**प्रलंबित स्वच्छतेचा प्रश्न मार्गी**

गोलाणी मार्केटमधील गाळेधारक कोर्टात गेल्यामुळे या परिसरातील स्वच्छतेचा मुद्दा दीर्घकाळापासून प्रलंबित होता. मात्र, स्थानिक



नागरिकांनी महापौरांकडे सातत्याने केलेल्या तक्रारींची दखल घेत, महापौरांनी विशेष मोहिमेचे आयोजन केले. व्यापाऱ्यांनी यापुढे स्वतःच्या दुकानांची स्वच्छतेबाबत जबाबदारी घ्यावी, दरवेळेला स्वच्छतेसाठी महापालिकेवर अवलंबून राहणे योग्य नाही, अशा स्पष्ट शब्दांत महापौरांनी यावेळी दुकानदारांना सुनावले.

> **'स्वच्छता ही केवळ महापालिकेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. दुकानदारांनी आपल्या दुकानाबाहेर कचराकुंडी ठेवावी, ग्राहकांना कचरा न टाकण्याचे आवाहन करावे आणि प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवून बायोग्रेडेबल थैली किंवा कापडी पिशव्यांचा वापर करावा'.**
>
> **- दीपमाला काळे,**
> महापौर (जळगाव)

**धडक कामगिरी: २२ टन कचरा उचलला**

सहायक आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली ४५३ बीव्हीजी कामगारांच्या माध्यमातून ही मोहीम राबविण्यात आली. यामध्ये यंत्रणा: ५ ट्रॅक्टर, ३ पिकअप आणि १ डंपरचा वापर, संकलन: तब्बल २२ टन कचरा मार्केट परिसरातून हटवण्यात आला. अभियानादरम्यान महापौरांनी फळ विक्रेत्यांची चांगलीच झाडाझडती घेतली. खराब फळे, गवत आणि कागदी कचरा रस्त्यावर फेकणाऱ्या विक्रेत्यांना तो कचरा स्वतः उचलायला लावून कचराकुंडीत टाकण्यास भाग पाडले. तसेच, प्लास्टिक पिशव्या वापरणाऱ्यांवर थेट कारवाई करत पिशव्या जप्त करण्यात आल्या. येत्या दोन दिवसांत प्लास्टिकचा वापर सुरू ठेवल्यास दंडात्मक कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला. या मोहिमेत स्थानिक नगरसेवक तथा माजी महापौर व शिवसेना गटनेते विष्णू भंगाळे, स्वच्छता अधिकारी अनिल कांबळे, मुख्य स्वच्छता निरीक्षक रमेश कांबळे, रुपेश भालेराव, मुकेश पाटील, समाधान निकम, मयूर सपकाळे, प्रदीप धापसे यांच्यासह विविध युनिटचे प्रमुख, स्वच्छता कर्मचारी आणि स्थानिक व्यापारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## मन्यारखेडा येथे ग्रह-राशी-नक्षत्र मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची जलयात्रेने भव्य सुरुवात



प्रतिनिधी । जळगाव

**तालुक्यातील मन्यारखेडा येथील विश्वातील एकमेव ग्रह, राशी व नक्षत्र मंदिराच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला शनिवार दि. २८ मार्च संध्याकाळी जलयात्रेने उत्साहात प्रारंभ झाला. हा सोहळा २८ मार्च ते १० एप्रिल २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे.**

संध्याकाळी काढण्यात आलेल्या भव्य कलशयात्रेचा प्रारंभ चिमुकले राम मंदिर, नवीन बसस्थानक येथून झाला. स्वातंत्र्य चौक, नेरी नाका, पांझरापोळ टाकी, तेली चौक, विठ्ठल मंदिर, भाग्यलक्ष्मी टेन्ट मार्गे कालिका माता मंदिर येथे यात्रेचा समारोप झाला.

या जलयात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे भारतातील विविध पवित्र नद्यांचे तसेच समुद्राचे जल ५१ कलशांमध्ये भरून महिलांकडून ही कलशयात्रा काढण्यात आली. यात्रेच्या मार्गावर ठिकठिकाणी भक्तांनी उत्स्फूर्त स्वागत केले. यात्रेत उंट, बग्गी तसेच मोटू-पटलू, तात्या विचू, डोरेमॉन या आकर्षक बाहुल्यांनी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांचे लक्ष वेधले. याशिवाय गावातील १२ वर्षांपर्यंतच्या मुलींच्या लेझीम पथकाने आणि मुलांच्या ढोल पथकाने वातावरण अधिकच रंगतदार केले.

या कलशयात्रेत भाविक भक्तांसह परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. संपूर्ण गावात भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे.

या कलशयात्रेत लहान मुलांचे लेझीम तसेच यात्रेत उंट, बग्गी तसेच मोटू-पटलू, तात्या विचू, डोरेमॉन या आकर्षक बाहुल्यांनी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांचे लक्ष वेधले. १० एप्रिलपर्यंत होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात

### रिंगरोड हनुमान मंदिरात महाप्रसाद

**जळगाव ।** शहरातील रिंगरोडवरील हनुमान मंदिरात श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त दि. २ एप्रिल रोजी महाप्रसाद व भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहतील, अशी अपेक्षा आहे. कार्यक्रमाचे आयोजन माजी उपमहापौर तथा माजी नगरसेवक डॉ. अश्विन शांताराम सोनवणे यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. दुपारी १२ ते ३ या वेळेत महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

### जि.प. केंद्र शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात

**पहूर ।** जामनेर तालुक्यातील पाळधी येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलाप्रकारांनी कार्यक्रमाला रंगत आणली. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण बिग बॉस फेम सचिन भाऊ कुमावत, तसेच अण्णा सुरवाडे व त्यांच्या टीमची उपस्थिती ठरली. त्यांनी विद्यार्थ्यांसोबत नृत्यात सहभाग घेत मुलांचा उत्साह द्विगुणित केला आणि उपस्थितांचे भरघोस मनोरंजन केले. या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी मुलांचे व मुलींचे विविध समूह नृत्य सादर केले.

# महाराष्ट्र रागरत्न पुरस्काराने सूरमणी डॉ. तळणीकर यांचा गौरव

प्रतिनिधी । पाचोरा

**महाराष्ट्र राज्य नालंदा फाउंडेशनच्या वतीने जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथील मूळ रहिवाशी, पुणे येथे स्थाईक असलेले सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक सुरमणी डॉ. सुधाकर तळणीकर यांना महाराष्ट्र रागरत्न या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा आनंद सोहळा अत्यंत उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात पार पडला.**



या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. डॉ. तळणीकर यांच्या संगीत क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा गौरव करताना उपस्थितांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. डॉ. सुधाकर तळणीकर यांना यापूर्वीही महाराष्ट्र शासनाच्या वतीने सुरमणी हा किताब प्रदान करण्यात आला आहे. तसेच त्यांना माजी राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्या हस्ते राष्ट्रपती पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे. याशिवाय अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. संगीत क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानामुळे त्यांचे नाव विशेष आदराने घेतले जाते. या सन्मानामुळे त्यांच्या कार्याला आणखी एक मानाचा तुरा मिळाला असून, संगीतप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.श्री. तळणीकर यांनी पाचोरा येथील विविध शिक्षण संस्थेत संगीत शिक्षक म्हणून कार्य केले असून त्यांनी नव्या पिढीतील अनेक शिष्य संगीत आणि गायन कलेत पारंगत केले आहे. त्यांना मिळालेल्या पुरस्काराने पुन्हा एकदा जळगाव जिल्हा आणि पाचोरा नगरीच्या नावलौकिकात भर पडली असून त्यांचे संगीत विश्वात कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

# मुस्लिम बहुल वस्तीत मराठी वाचनालय; भाषिक एकात्मतेचा दिला संदेश

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील सुप्रीम कॉलनी परिसरात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शाखेतर्फे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी एक अत्यंत कौतुकास्पद आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला आहे. मुस्लिम बहुल वस्तीमध्ये मराठी वृत्तपत्रांचे वाचनालय सुरू करून भाषिक एकात्मतेचा सुंदर संदेश देण्यात आला आहे.**



जळगाव शहरातून प्रकाशित होणारी सर्व प्रमुख मराठी वर्तमानपत्रे या वाचनालयात उपलब्ध करून देण्यात आली असून, परिसरातील नागरिकांमध्ये मराठी वाचनाची गोडी निर्माण व्हावी हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. विशेष म्हणजे, दररोज दैनिक शौर्यमराठीसह १० विविध मराठी वृत्तपत्रे वाचकांसाठी उपलब्ध राहणार असून, त्यामुळे माहितीचा आणि ज्ञानाचा एक नवा दरवाजा नागरिकांसाठी खुला झाला आहे. या वाचनालयाचे उद्घाटन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संपर्क अध्यक्ष यांच्या हस्ते ढोल-ताशांच्या उत्साही वातावरणात पार पडले. कार्यक्रमात स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, ज्यामुळे हा उपक्रम खऱ्या अर्थाने लोकाभिमुख ठरल्याचे दिसून आले.

या वेळी बोलताना जळगाव जिल्हा संपर्क अध्यक्ष गजानन राणे यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक करत, मुस्लिम बहुल भागात मराठी वर्तमानपत्रांचे वाचनालय सुरू करणे हे केवळ भाषेच्या जतनासाठीच नव्हे, तर समाजातील विविध घटकांना जोडणारा एक सकारात्मक पूल आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा हा उपक्रम मराठी भाषा समृद्ध करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, असे गौरवोद्गार काढले. हा उपक्रम केवळ वाचनाची सवय वाढवणारा नाही, तर समाजात ऐक्य, समजूतदारपणा आणि सांस्कृतिक जवळीक निर्माण करणारा ठरणार आहे. अशा प्रकारचे उपक्रम समाजासाठी मार्गदर्शक ठरतात आणि मराठी भाषेचा गौरव अधिक उंचावतात.

याप्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष ॲड जमील देशपांडे, महानगर अध्यक्ष विनोद शिंदे, किरण तळेले... उप महानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, राजेंद्र निकम, ललित शर्मा, चेतन पवार, सुप्रसिद्ध कलाकार जहांगीर पेंटर, विभाग अध्यक्ष राहुल चव्हाण, विशाल जाधव,खुशाल ठाकूर, महेंद्र सपकाळे, विकास पाथरे, शाखा अध्यक्ष युसुफ खाटीक, बादशाह शहा, बहुसंख्या महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

# चोपडा येथे बालक-पालक मेळावा उत्साहात

प्रतिनिधी । चोपडा

आधार बहुउद्देशीय संस्थेतर्फे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेच्या लाभार्थी बालक व त्यांच्या पालकांसाठी भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. हा मेळावा चोपडा व अमळनेर परिसरातील लाभार्थ्यांसाठी जस्ट राईट फॉर चिल्ड्रेन्स प्रकल्पांतर्गत श्री संत सावता माळी समाज सभागृह, चोपडा येथे पार पडला.



महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेत अनाथ, एकल पालक असलेली किंवा अपंग पालकांची मुले यांचा समावेश आहे. विशेषतः कोरोना काळानंतर अनाथ झालेल्या बालकांना या योजनेतून मदत दिली जाते.

पालक व बालकांमध्ये संवाद वाढावा तसेच योजनांची सविस्तर माहिती मिळावी, या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात सुमारे २५० पालक व बालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार भाऊसाहेब थोरात होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शासकीय योजना, कर्मचारी यांची भूमिका तसेच संरक्षणाखालील बालकांना मिळणाऱ्या सुविधा याबाबत सविस्तर माहिती दिली.

# धोबी वराड येथे वाळूच्या डंपरने वृद्धास चिरडले

प्रतिनिधी । जळगाव

**तालुक्यातील धोबी वराड येथे वाळू खाली करून निघालेल्या डंपरने बसस्टँड ते मराठी शाळेदरम्यान वृद्धाला चिरडले. त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना शनिवार दि.२८ मार्च रोजी संध्याकाळी ७ ते ८ वाजेदरम्यान घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.**

बशीरशहा मगबुलशा फकीर (वय ७५, रा. धोबी वराड ता. जळगाव) असे मृत वृद्धाचे नाव आहे. ते गावामध्ये परिवारासह राहत होते. ते संध्याकाळी एका कामानिमित्त मराठी शाळेकडे गेले होते. त्याच वेळेला (एमएच ४७ ए एस ९५४८) हा डंपर मराठी शाळेत वाळू खाली करून रिकामे डंपर भरधाव जात होता. रस्त्यात या डंपर चालकाने बेदरकारपणे बशीरशहा यांना धडक देऊन चिरडले. त्यांच्या जागीच मृत्यू झाला. घटनास्थळी नागरिकांची एकच गर्दी जमा झाली. एमआयडीसी पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांना घटना कळताच त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्या ठिकाणी डंपर ताब्यात घेऊन तो पोलीस स्टेशनला जमा केला आहे. तर चालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. वृद्धाचा मृतदेह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दाखल करण्यात आला आहे. रुग्णालयात मृत बशीर शहा यांच्या नातेवाइकांनी एकच आक्रोश केला. याबाबत एमआयडीसी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात 'फिनिक्स २के २६' टेक्निकल इव्हेंट उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

**विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या सुप्त क्षमतांना चालना मिळावी आणि तांत्रिक ज्ञानासोबतच नवकल्पनांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने गोदावरी अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयात 'फिनिक्स २ के२६' हा टेक्निकल इव्हेंट दि. २८ मार्च २०२६ रोजी उत्साहात पार पडला.**



या उपक्रमांतर्गत कोड वॉर, कॅड गुरु, फॉर्म्युला फन, बॅटल ऑफ ब्रेन्स, वेब क्राफ्ट एआय, पोस्टर प्रेझेंटेशन, शार्क टँक अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत आपल्या कौशल्याचे प्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी गोदावरी फाउंडेशनच्या सचिव डॉ. वर्षा पाटील प्रमुख उपस्थित होत्या. तसेच विशेष पाहुणे म्हणून श्री विनोद पाटील (सुप्रीटेंडिंग इंजिनीयर, एमएसईडीसीएल, जळगाव) उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, समन्वयक प्रा. दीपक झांबरे, अधिष्ठाता डॉ. तुषार कोळी, रजिस्ट्रार डॉ. ईश्वर जाधव तसेच कार्यक्रम समन्वयक प्रा. देवेंद्र फेगडे आणि विभागप्रमुख व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. मान्यवरांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी फिनिक्स उपक्रमाची माहिती देत हा उपक्रम मागील २३ वर्षांपासून अखंडपणे सुरू असल्याचे सांगितले. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये बहुआयामी ज्ञान विकसित होते, असे त्यांनी नमूद केले.

विशेष पाहुणे विनोद पाटील यांनी विद्यार्थ्यांना फक्त पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता नव्या तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्याचे, संशोधनाकडे वळण्याचे आणि कौशल्य विकासावर भर देण्याचे आवाहन केले. त्यांनी सोलर इनोव्हेशनसह आधुनिक तंत्रज्ञानाच्या संधींबाबत मार्गदर्शन केले.

डॉ. वर्षा पाटील यांनी विद्यार्थ्यांना वेळेचे महत्त्व ओळखून शिस्तबद्ध दिनचर्या ठेवण्याचा सल्ला देत अशा उपक्रमांमध्ये सातत्याने सहभागी होण्याचे आवाहन केले.या इव्हेंटमध्ये ७०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. जिल्ह्यासह परिसरातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये आपली गुणवत्ता सिद्ध केली.विजेत्या स्पर्धकांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे ३०००, २००० व १००० रुपये तसेच ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. बक्षीस वितरण समारंभासाठी इग्नाइट अकॅडमी, पॅशन सॉफ्टवेअर जळगाव, किरण अकॅडमी पुणे, सॉफ्टेड, इलेक्ट्रोसॉफ्ट व एम सॉफ्ट हे प्रायोजक उपस्थित राहणार आहेत.

## पोलिसांच्या कामात अडथळा दोघांविरोधात गुन्हा

प्रतिनिधी । फैजपूर

पोलिस ठाण्यातील ठाणे अंमलदाराच्या कक्षात येत सेवन केलेला गुटखा दोघांनी तेथे थुंकत शहरात दादागिरी वाढल्यानंतर तुम्ही काय करतात ? असे म्हणत उलट पोलिसालाच धक्काबुक्की करण्यात आल्याचा प्रकार घडला. ही घटना शुक्रवारी सकाळी ११.३० वाजता घडली. याप्रकरणी दोन तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फैजपूर पोलीस ठाण्यात शुक्रवारी भूषण प्रमोद भिरूड (२६) व धीरज विजय सोनवणे (२५, दोघे रा.फैजपूर) यांनी गुटखा सेवन करीत ठाणे अंमलदाराच्या कक्षात प्रवेश केला. त्या ठिकाणी तो गुटखा थुंकला.

# महाराष्ट्रावर ३० मार्चपासून अवकाळी पावसाचे संकट

## गारपिटीचा इशारा, काढणीच्या हंगामात शेतकरी धास्तावला

प्रतिनिधी । जळगाव

**राज्यात ३० मार्चपासून ढगाळ हवामान आणि दुपारनंतर होणाऱ्या वादळी पावसाचे नवीन सत्र सुरू होण्याचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तविण्यात आला आहे.**



सोमवारी दि.३० मार्चला प्रामुख्याने खान्देश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता आहे. उर्वरित विदर्भात देखील काही प्रमाणात हवामानात बदल दिसून येऊ शकतो. त्यामुळे याठिकाणी देखील वादळी पावसाची शक्यता नाकारता येत नाही असा अंदाज आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या 'एक्स' या सोशल मीडियावरून ही माहिती शेअर केली आहे.

**या भागात पावसाची शक्यता**

सोमवार, ३० मार्चच्या तुलनेत मंगळवारी ३१ मार्च रोजी एकंदरीत वादळी पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे. मात्र, या भागांमध्ये काही प्रमाणात अस्थिर हवामान आणि वादळी पाऊस पडू शकतो. त्यानंतर बुधवार १ ते शनिवारी ४ एप्रिल दरम्यान वादळी पावसाचे प्रमाण वाढण्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे या कालावधीत मध्य महाराष्ट्र, खान्देश, मराठवाडा आणि विदर्भातील ठिकठिकाणी आभाळी हवामान, दुपारनंतरचा वादळी पाऊस, आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा अंदाज हवामान खात्याने दिला आहे.

मेघगर्जना आणि विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे, असेही आवाहन करण्यात येत आहे.

### कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन

मार्चच्या माध्यान्हत पडून गेलेल्या पावसाने शेतकऱ्यांचे खूप मोठे नुकसान झाले. आता पुन्हा एकदा हवामानाचे बदलणारे रूप शेतकऱ्यांसाठी त्रासदायक ठरण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

# एसआयआर मतदार मॅपिंग जनजागृतीसाठी सूरमाज फाउंडेशनचा विशेष उपक्रम



प्रतिनिधी । चोपडा

**सूरमाज फाउंडेशनतर्फे (विशेष ओळख नोंदणी) संदर्भात व्यापक जनजागृती मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली. शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या या संस्थेने या उपक्रमाद्वारे नागरिकांना त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे.**

या मोहिमेअंतर्गत चोपडा शहरातील विविध भागांमध्ये स्वयंसेवकांनी घराघरांत जाऊन पत्रके वाटली व नागरिकांना प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे वेळेत तयार ठेवून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, यासाठी त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे आगामी मतदार यादीत समावेश होऊन अधिकाधिक नागरिकांना लोकशाही प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे.

या मोहिमेचे नेतृत्व फाउंडेशनचे अध्यक्ष हाजी उस्मान शेख यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अबुलैस शेख, डॉ. रागीब, शेख मुजाहिद-ए-इस्लाम, शमीम शेख, ॲडव्होकेट असीम, प्रा. डॉ. मोहम्मद जुबेर शेख, वजाहत अली काजी (अदावत), अली अकबर, अजहर जागीदार, जुनेद शेख, इलियास, शाहनवाज शाह, मोहसिन अली, असद सर आदी कार्यकर्त्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

या जनहिताच्या उपक्रमाबद्दल नागरिकांनी फाउंडेशनचे आभार मानले असून, ही मोहीम केवळ जनजागृतीपुरती मर्यादित न राहता जबाबदार नागरिकत्व व लोकशाही मूल्ये दृढ करण्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# धरणगावात उद्यापासून सिलिंडर घरपोच सेवा सुरू

## नगरसेवक सुनील चौधरी यांच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी । धरणगाव

येथील इंडेन गॅस एजन्सीमार्फत होणाऱ्या सिलेंडर वितरणातील अनियमितता व गैरसोयींमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. पहाटेपासूनच ग्राहकांना लांबच लांब रांगा लावाव्या लागत होत्या. कडक उन्हात तासन्तास प्रतीक्षा करूनही अनेकांना वेळेत सिलेंडर मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. या समस्येची गांभीर्याने दखल घेत नगरसेवक सुनील चौधरी यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी २३ मार्च रोजी तहसीलदार व पुरवठा अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यामध्ये घरपोच



सिलेंडर वितरण सेवा तात्काळ सुरू करण्याची ठाम मागणी करण्यात आली होती. नगरसेवक चौधरी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे प्रशासनाने या मागणीची दखल घेत सकारात्मक निर्णय घेतला.

मागील आठवड्यातच पुरवठा विभागाने घरपोच सेवेचे आश्वासन दिले होते. त्यानुसार येत्या मंगळवारपासून धरणगावात सिलेंडर घरपोच वितरण सेवा अधिकृतपणे सुरू करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, रांगा, गर्दी व वेळेची नासाडी टळणार आहे.

वितरण प्रक्रियेत शिस्त व पारदर्शकता येण्यासही मदत होणार आहे. दरम्यान, नगरसेवक सुनील चौधरी यांनी नागरिकांना आवाहन केले की, एजन्सीजवळ अनावश्यक गर्दी करू नये. घरपोच सेवाचा लाभ घ्यावा व प्रशासनाला सहकार्य करावे. एकूणच, या सकारात्मक निर्णयामुळे धरणगावातील गॅस वितरण व्यवस्थेत सुधारणा होऊन नागरिकांच्या दैनंदिन जीवनात मोठा दिलासा मिळणार आहे.

# पहूरमध्ये श्रीराम नवमी उत्साहात साजरी

प्रतिनिधी । पहूर

जामनेर तालुक्यातील पहूर येथे श्रीराम नवमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. पहूर पेठ येथील श्रीराम मंदिराचे बांधकाम सुरू असल्यामुळे यंदाचा श्रीराम जन्मोत्सव सोहळा श्रीकृष्ण मंदिरात पार पडला. दुपारी श्रीराम जन्मोत्सवानिमित्त आयोजित कीर्तनाला भाविकांची मोठी गर्दी झाली होती. उपस्थितांनी भक्तिभावाने कीर्तनाचा लाभ घेतला.

# लासूरच्या भगिनींच्या चपात्यांचा स्वाद; आर्वी भंडाऱ्यात भक्त तृप्त

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील लासूर येथे श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त आयोजित महाप्रसाद कार्यक्रमातून सेवाभाव, भक्ती आणि मानवतेचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.**



हा उपक्रम केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित न राहता समाजसेवेचे उत्कृष्ट उदाहरण ठरला. या महाप्रसादातून उरलेले अन्न अत्यंत नियोजनपूर्वक आर्वी येथील रोकड बालाजी हनुमान मंदिरात आयोजित भंडाऱ्यासाठी अर्पण करण्यात आले. सप्तशृंगी माता वणी गड पदयात्रेसाठी निघालेल्या भाविकांच्या सेवेसाठी हा महाप्रसाद देण्यात आला. श्री १००८ महामंडलेश्वर महात्यागी प.पू. शिवचरणदास बाबाजी यांच्या प्रेरणेने हा उपक्रम राबविण्यात आला. या भंडाऱ्यातील विशेष आकर्षण ठरल्या त्या लासूर येथील महिला भगिनींनी प्रेमाने व श्रद्धेने बनवलेल्या चपात्या. त्यांच्या निस्वार्थ सेवेने संपूर्ण कार्यक्रमाला एक वेगळीच पवित्रता प्राप्त झाली. अन्नदान हेच श्रेष्ठ दान या उक्तीची प्रचिती या उपक्रमातून सर्वांना आली. या सेवाभावी कार्यात सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीचे भाविक भक्तांकडून मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

## थोडक्यात

### वाहनाच्या साईड ग्लासचा धक्का लागल्यावरून एकाला मारहाण

**यावल ।** तालुक्यातील परसाडे चारचाकी वाहनाच्या साईड ग्लासचा धक्का लागल्याच्या कारणावरून वाद झाला. या वादातून एका तरुणाला तिघांनी शिवीगाळ करीत काठीने मारून दुखापत केली. याप्रकरणी यावल पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. अश्फाक फिरोज तडवी (वय २२) हा तरुण छोटा हत्ती वाहन (क्रमांक एम.एच.४७ ई. ०५९५) घेऊन जात असताना त्याच्या साईड ग्लासचा धक्का लागल्यावरून वाद झाला. या वादातून अश्फाक तडवीला इरफान तुकडू तडवी, अकिल शावखा तडवी व इरफान रशीद तडवी यांनी शिवीगाळ करून मारहाण केली.

### पारोळा श्रीराम मंदिर संस्थानात श्रीराम जन्मोत्सव सोहळा

**पारोळा ।** येथील मोठे श्रीराम मंदिर संस्थानात श्रीराम जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत श्री श्याम सेवा समितीतर्फे भक्ती संगीत आयोजित केले होते. सुश्राव्य भजनांनी संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय झाले होते. दुपारी बाराला प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव महाआरती करण्यात आली. यावेळी आमदार अमोल पाटील, नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपनगराध्यक्ष ॲड रोहन मोरे, माजी उपनगराध्यक्ष सुरेंद्र बोहरा, दीपक अनुष्ठान, अशोक वाणी, नगरसेविका निर्मला वाणी, किरण पाटील, पोलिस निरीक्षक अशोक पवार, मिलिंद मिसर, नगरसेवक राजेंद्र कासार, पंकज मराठे, छोटू पाटील, व्यापारी बांधव व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवापूर येथील दाम्पत्याने झाडाला दोरी बांधून घेतला गळफास

प्रतिनिधी । चाळीसगाव

**तालुक्यातील शिवापूर येथे एक हृदय पिळवटून टाकणारी घटना उघडकीस आली आहे. इथं एका दाम्पत्याने एकाच झाडाला एकाच दोरीने गळफास लावून आत्महत्या केली आहे. संसाराचा गाडा हाकताना पती-पत्नी आयुष्यभर एकमेकांना साथ देण्याची वचनं घेत असतात, या दोघांनी मृत्यूच्या दारातही एकमेकांची साथ न सोडता जीवनाचा शेवट केला आहे.**

भगवान पोपट जाधव (वय ३८) आणि आशाबाई भगवान जाधव (वय २७) असं आत्महत्या करणाऱ्या पती-पत्नीचं नाव आहे. दोघांनी आपल्या शेतात एकाच झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त होत आहे. मृत जाधव दाम्पत्य हे शिवापूर शिवारातील आपल्या शेतातच वास्तव्यास होतं. भगवान जाधव हे शेतीसोबतच मजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. शुक्रवारी मध्यरात्रीच्या



सुमारास या दोघांनी घरापासून काही अंतरावर असलेल्या उंबराच्या झाडाला एकाच दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला.

सकाळी नेहमीप्रमाणे नातेवाईक शेतात गेले असता, त्यांना झाडाला लटकलेल्या अवस्थेत हे दाम्पत्य आढळून आलं. या घटनेची माहिती मिळताच परिसरात खळबळ उडाली. नातेवाइकांनी तातडीने दोघांना खाली उतरवून चाळीसगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणी अंती दोघांना मृत घोषित केलं.

मृत भगवान आणि आशाबाई यांना एक मुलगा आणि एक मुलगी अशी दोन अपत्य आहेत. ही दोन्ही मुले शिक्षणासाठी सध्या बाहेरगावी राहत असल्याने या भीषण घटनेवेळी ती घरी नव्हती. आई-वडिलांच्या

**जाधव दांपत्याने हे टोकाचे पाऊल का उचलले? याचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. घरगुती वाद, आर्थिक विवंचना की अन्य काही कारण, याचा शोध पोलीस घेत आहेत. घटनास्थळी पंचनामा करण्यात आला असून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. याप्रकरणी चाळीसगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक घटनेचा सखोल तपास करत आहे.**

या टोकाच्या पावलामुळे ही दोन्ही चिमुरडी आता पोरकी झाली आहेत. त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मुलांच्या भविष्याचा विचार न करता दाम्पत्याने हे पाऊल का उचललं? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# प्रविण पाटील फाउंडेशनतर्फे बेटी बचाव उपक्रम यशस्वी

प्रतिनिधी । जळगाव

समाजात मुलींच्या संरक्षण, सन्मान आणि शिक्षणाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने प्रविण पाटील फाउंडेशनतर्फे बेटी बचाव उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. उपक्रमांतर्गत नवजात मुलींचे स्वागत करण्यात आले, त्यांच्या पालकांचा सत्कार करून मुलींच्या संगोपनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. उपस्थितांना मुलींच्या शिक्षणाचे आणि सक्षमीकरणाचे संदेशं दिले गेले.

# छुप्या बुवाबाबांवर सर्वेक्षण करून कारवाई करा

## अंधश्रद्धा निर्मूलन समितीची मागणी

प्रतिनिधी । भुसावळ

**शहर व गावपातळीवर छुप्या पद्धतीने कार्यरत असलेल्या बुवाबाबांचा सर्वेक्षण करून त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी तसेच संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये त्यांची नोंद ठेवावी, अशी ठोस मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांनी भुसावळ तापी रोड विश्राम गृहात आयोजीत पत्रकार परिषदेत केली.**

यावेळी बुवाबाजी संघर्ष विभागाचे अरुण दामोदरे, डॉ. सुभाष लोखंडे, जिल्हा उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र बावस्कर, ॲड. सागर बहिरुणे, सिद्धार्थ सोनवणे, विजय साळवे, शांताराम जाधव, डॉ. रुपेश मोरे, माधुरी मोरे, सुमंगल अहिरे, निरंजना तायडे, नरेश वाघ, अंजना निरभवणे, आर. एस. कांबळे, मुरलीधर सोनवणे व मनोज सुरवाडे उपस्थित होते. राज्यात सध्या बुवाबाबांचा सुळसुळाट वाढत असून, शासन व समाजाच्या दुर्लक्षामुळे अशा प्रवृत्तींना खतपाणी मिळत असल्याचा आरोप समितीने केला.

राम रहीम व आसाराम बापू यांसारख्या प्रकरणांमध्ये तक्रारी उशिरा झाल्यामुळेच त्यांचा उशिरा पर्दाफाश झाला, तर काही बुवाबाबा अनेक वर्षे उघडपणे कार्यरत राहिल्याची उदाहरणेही पुढे आली आहेत. त्यामुळे अशा प्रकारांना वेळेत आळा घालणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

राज्यात जादूटोणा विरोधी कायदा अस्तित्वात असला तरी त्यातील काही तरतुदी बुवाबाजी रोखण्यासाठी अपुऱ्या ठरत असल्याचेही निदर्शनास आणण्यात आले. पूजा-विधी, ज्योतिष आदींच्या नावाखाली फसवणूक सुरू असून विशेषतः महिलांचा सहभाग वाढत असल्याची चिंताही व्यक्त करण्यात आली. ज्योतिषशास्त्राला वैज्ञानिक आधार नसतानाही लोकांचा त्याकडे वाढता ओढा का आहे, यावर संशोधन होण्याची गरज समितीने व्यक्त केली. राजकीय व्यक्तींकडून अशा बुवाबाबांना मिळणाऱ्या उपस्थितीमुळे त्यांना अधिक प्रसिद्धी मिळत असल्याचेही नमूद करण्यात आले. त्यामुळे गाव व शहर पातळीवर कार्यरत अशा छुप्या घटकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस यंत्रणेकडून सर्वेक्षण करून नोंदी ठेवणे अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# गोरगावले प्राथमिक आरोग्य केंद्रात एचपीव्ही लसीकरणास प्रारंभ

## गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण देणारी लस २३ मुलींनी घेतली

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील गोरगावले बु. येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शनिवारी (दि.२८) एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण देणारी ही लस असल्याने यास विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.**



मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर यांच्या आदेशानुसार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गिरीष गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. गौरीशंकर शिसोदिया, डॉ. दिनेश निळे व डॉ. शर्वरी पाटील उपस्थित होते. या लसीकरण सत्रात १५ वर्ष वयोगटातील एकूण ३८९ अपेक्षित मुलींमधून २३ मुलींनी एचपीव्ही लस घेतली. कार्यक्रमाचे उद्घाटन ग्रामपंचायत प्रशासक तथा माजी सरपंच सौ. सुरेखा कोळी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तालुका आरोग्य सहाय्यक विजय देशमुख व लसीकरण सनियंत्रण अधिकारी दिलवर वडवी उपस्थित होते. डॉ. दिनेश निळे यांनी लाभार्थी व पालकांना एचपीव्ही लसीचे महत्त्व व फायदे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या उपक्रमात आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका तसेच पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.